महावितरण

# महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष : १८ ■ अंक : ११ ■ मार्च २०२४ ■ पाने : ८

# वीज ग्राहकांना गुणवत्तापूर्ण सेवा हे आपले कर्तव्य

## हितगूज



**श्री. लोकेश चंद्र**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**महात्मा गांधी** यांचे एक प्रसिद्ध वचन आहे. सेवा क्षेत्रातील सार्वजनिक कंपनीचा प्रमुख म्हणून मला ते फार आवडते. महात्मा गांधी यांनी केवळ वीज क्षेत्रच नव्हे तर सेवा क्षेत्रातील सर्वांनाच योग्य दिशा दाखवली आहे. गांधीजींनी म्हटले आहे, ''ग्राहक आपल्यावर अवलंबून नाही तर आपण त्यावर अवलंबून आहोत. ग्राहक हे आपल्या कामातील अडथळा नाहीत तर ते आपल्या कामाचे कारण आहेत.''

तीन कोटी वीज ग्राहकांसह महावितरण ही देशातील सर्वात मोठी वीज कंपनी आहे. महावितरणकडून वितरित केली जाणारी वीज, कंपनीचे वीजवितरणाचे जाळे, कंपनीला मिळणारा महसूल या बाबतीत महावितरणची बरोबरी देशातील कोणतीही अन्य कंपनी करू शकत नाही. पण हे सर्व वीजग्राहकांमुळे शक्य झाले आहे. त्यांना गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार सेवा देणे हे आपले कर्तव्य आहे.

### ग्राहकांच्या सेवेसाठी विशेष मोहीम

वीज ग्राहकांना मिळणारी सेवा अधिकाधिक सुधारण्यासाठी गेल्या जून महिन्यापासून आपण विशेष प्रयत्न चालविले आहेत. वीज ग्राहकांना नवीन जोडण्या झटपट मिळाल्या पाहिजेत, असा आपला आग्रह आहे. मला आनंद आहे की, अनेक परिमंडलांमध्ये ग्राहकांना अर्ज केल्यापासून चोवीस तासात वीज जोडण्या दिल्या गेल्या आहेत. गेल्या जून महिन्यात आपण पद्धतशीर प्रयत्न सुरु केल्यापासून वीज जोडण्यांसाठी प्रलंबित अर्जांची संख्या झपाट्याने कमी झाली आहे. याबाबतीत आपण वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत नियमित आढावा घेतो. मी स्वतः याचा सातत्याने पाठपुरावा करतो.

नवीन वीज जोडण्यांच्या बाबतीत महावितरणने अलिकडच्या काळात कामगिरी चांगली सुधारली असली तरी माझ्या मते अधिक सुधारणेला वाव आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेल्या कालमर्यादेत (एसओपी) महावितरणकडे आलेल्या प्रत्येक ग्राहकाला वीज जोडणी मिळेल तेव्हाच हे अभियान पूर्ण यशस्वी होईल. त्यामुळेच नवीन वीज जोडण्यांच्या बाबतीत एसओपीचे पालन केले नाही, तर संबंधित अधिकाऱ्याच्या वेतनातून दंडाची रक्कम कापून घेण्याचा निर्णय झाला आहे. महावितरणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना माझे आवाहन आहे की, नवीन वीजजोडण्याच्या बाबतीत आपल्या कामाला आणखी गती देऊ आणि प्रत्येक कनेक्शन एसओपीनुसार देण्याचे उद्दीष्ट साध्य करू.

महावितरणकडून ग्राहकांना नियमित आणि दर्जेदार वीज पुरवठा करणे हे सुद्धा आपले कर्तव्य आहे. सिंधुदुर्ग ते गडचिरोली आणि पालघर ते गोंदिया असे विस्तीर्ण क्षेत्र असलेल्या महाराष्ट्रात सातत्यपूर्ण व दर्जेदार वीज पुरवठा करण्यात अनेक अडचणी येतात, हे मला मान्य आहे. तथापि, अशा अडचणींवर मात करणे आणि ग्राहकांना चांगली सेवा देणे हीच आपली कसोटी आहे. तौक्तेसारख्या वादळानंतर महावितरणच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी अनेक आव्हाने पेलून वीज पुरवठा पूर्ववत केला आहे. समुद्राच्या तळाशी केबल टाकून मुंबईजवळ एलिफंटा बेटावर वीज पोहचविण्याचे आव्हानात्मक काम महावितरणने केले आहे. डोंगरावरील वीज ग्राहकांना नियमित वीज पुरवठा व्हावा म्हणून खांद्यावरुन ट्रान्सफॉर्मर नेण्याचेही काम महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी केले आहे. संकटकाळी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची धडाडी आणि कार्यक्षमता वाखाणण्यासारखी असते. त्यांनी अनेक अशक्य कामे करून दाखविली आहेत. त्याच पद्धतीने इतर वेळीही सातत्याने आणि चिकाटीने प्रयत्न करून ग्राहकांना गुणवत्तापूर्ण वीज पुरवठा करणे अपेक्षित आहे. राज्यात विविध ठिकाणी वीज पुरवठ्यामध्ये येणाऱ्या समस्या वेगवेगळ्या प्रकारच्या असतात. त्या त्या ठिकाणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कल्पकतेने उपाय करून वीज पुरवठा अखंडित राहण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

### स्मार्ट मीटरमुळे ग्राहकसेवा अधिक उंचावेल

महावितरणने मीटर रिडिंगच्या बाबतीत एक चांगली कामगिरी यापूर्वी केली आहे. मीटरच्या अस्पष्ट फोटोंचे प्रमाण पध्दतशीर प्रयत्न करून खूप कमी केले. मीटरच्या बाबतीत ग्राहकांच्या तक्रारी मुळापासून संपुष्टात याव्यात आणि बिलाबाबत काही तक्रार राहू नये, यासाठी महावितरणने एक ऐतिहासिक काम हाती घेतले आहे. लवकरच राज्यात ठिकठिकाणी स्मार्ट मीटर बसविण्यास सुरुवात होत आहे. स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना त्यांनी केलेला विजेचा वापर त्यांच्या मोबाईलवर नियमितपणे समजेल तसेच त्यांना त्यांच्या सोईनुसार आधीच पैसे भरून जेवढे पैसे तेवढी वीज, ही सुविधा वापरता येईल. या दोन कारणांमुळे वीज ग्राहकांच्या मीटर रिडिंग आणि बिलाबाबतच्या तक्रारी पूर्णपणे संपुष्टात येतील. स्मार्ट मीटरच्या बाबतीत यापूर्वीच मी या स्तंभात चर्चा केली होती. महावितरणच्या ग्राहकांना सेवा देण्याच्या बाबतीत हे अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल आहे. महावितरणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी याची माहिती घेऊन वीज ग्राहकांमध्ये जागृती निर्माण करावी, असे माझे आवाहन आहे.

एसओपीनुसार नवीन वीज कनेक्शन, मीटर रिडिंग तसेच बिलाविषयीच्या तक्रारींचे समाधानकारक निराकरण आणि नियमित वीजपुरवठा ही वीज ग्राहकांना सेवा देण्याच्या बाबतीत महत्त्वाची त्रिसुत्री आहे. महात्मा गांधी यांनी संदेशात म्हटले आहे, ''ग्राहकांची सेवा करून आम्ही त्यांच्यावर उपकार करीत नाही तर सेवा करण्याची संधी देऊन तेच आम्हाला उपकृत करित आहेत.'' तीन कोटी वीज ग्राहकांची सेवा करण्याची संधी आपल्याला मिळाली आहे, हे आपले भाग्यच म्हटले पाहिजे. ■

# मध्यप्रदेश वीज कंपनीने दिली नागपूर परिमंडलास भेट



३३ केव्ही नागभवन उपकेंद्राला मध्यप्रदेश विद्युत वितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट दिली

**महावितरणतर्फे** करण्यात येणाऱ्या वीज पुरवठ्याच्या देखभाल आणि दुरुस्ती कामाच्या कार्यपद्धतीचा अभाव साधण्यासाठी मध्यप्रदेश विद्युत वितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नागपूर परिमंडलातील कार्यालयांना भेट देत राबविण्यात येत असलेल्या देखभाल आणि दुरुस्ती कामांच्या कार्यपद्धतीची प्रत्यक्ष माहिती घेतली.

मध्यप्रदेश विद्युत वितरण कंपनीचे महाव्यवस्थापक श्री. आर. पी चौबे आणि श्री. शिशिर गुप्ता या दोन अधिकाऱ्यांनी नुकतीच नागपूर परिमंडलातील विविध कार्यालये, उपकेंद्रांन भेट दिली. त्यांच्या या दोन दिवसीय अभ्यास दौऱ्यात त्यांनी ३३ केव्ही चिंतेश्वर उपकेंद्र, ३३ केव्ही नागभवन उपकेंद्राला भेट दिली. सोबतच केबल जोडणी सुरु असलेल्या कामाची पाहणी केली.

नागपूर परिक्षेत्राचे प्रादेशिक संचालक श्री. सुहास रंगारी, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके, नागपूर शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. अमित परांजपे व इतर संबंधित अधिकाऱ्यांनी मध्यप्रदेश विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना तपशिलवार माहिती दिली.

# भारतीय सैन्यदलासाठी बंडगार्डन विभागात ७२ जणांचे रक्तदान



रक्तदान शिबिराप्रसंगी उपस्थित मान्यवर.

**पुणे परिमंडल** अंतर्गत बंडगार्डन विभागात भारतीय सैन्यदलासाठी नुकतेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ७२ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून राष्ट्रीय कर्तव्य बजावले.

सशस्त्र वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहकार्याने बंडगार्डन विभाग कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी या विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. धवल सावंत, अतिरिक्त कार्यकारी अभियंते सर्वश्री विष्णू पवार, सतीश उमरजे, हितेंद्र भिरूड, संजय मालपे व अमित भरते, उपकार्यकारी अभियंता श्री. फुलचंद फड, उपव्यवस्थापक श्रीमती शिल्पा बारापत्रे आदींसह ७२ जणांनी रक्तदान केले. यात आठ महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे हे विशेष. या शिबिरात कार्यकारी अभियंता श्री.अशोक जाधव, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. शिरीष काटकर, सुभेदार श्री. कुलदीप भदोरिया यांची उपस्थिती होती. मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार व अधीक्षक अभियंता श्री. अरविंद बुलबुले यांनी या उपक्रमासाठी बंडगार्डन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

‘लाईनमन’ दिनानिमित्त

# कर्मचाऱ्यांचा दिल्लीत गौरव



श्रीमती श्रावणी शेलार



श्रीमती हंसा कुर्वे



श्री. महेशकुमार वडचकर



श्री. प्रकाश पाटील



श्री. हेमेंद्र गौर

**वीज वितरण** क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटविणारे अधिकारी व कर्मचारी यांचा केंद्र सरकारच्या वतीने नुकताच गौरव करण्यात आला. केंद्रीय विद्युत प्राधिकरण यांच्या वतीने नवी दिल्ली येथील इंडीया हॅबिटॅट सेंटर येथे आयोजित ‘लाईनमन दिवस २०२४’ या कार्यक्रमात हा गौरव करण्यात आला.

यामध्ये नागपूर परिमंडलांतर्गत लष्करीबाग उपविभागातील कार्यरत अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. हेमेंद्र गौर, लष्करीबाग उपविभागातील वरिष्ठ तंत्रज्ञ श्रीमती हंसा कुर्वे, कोल्हापूर शहर विभागातील प्रधान तंत्रज्ञ श्री. प्रकाश पाटील, छत्रपती संभाजीनगर येथील क्रांतीचौक शाखा कार्यालयातील वरिष्ठ तंत्रज्ञ श्री.महेशकुमार वडचकर आणि भांडूप नागरी परिमंडल अंतर्गत किसाननगर शाखा ३ कार्यालयातील वरिष्ठ तंत्रज्ञ श्रीमती श्रावणी शेलार यांचा समावेश आहे.


# कर्मचाऱ्यांसाठी मीटर रीडिंग ॲप

**या महिन्यात** आपण अँड्रॉइड प्लॅटफॉर्मवर इंग्रजी तसेच मराठीमध्ये उपलब्ध असलेल्या मीटर रीडिंग ॲपची माहिती करून घेणार आहोत. विभागीय कर्मचारी आणि मीटर रीडिंग एजन्सी हे दोन्ही या ॲपचा वापर करू शकतात. वीज वितरण कंपनीसाठी योग्य मीटर रीडिंग ही सर्वात महत्वाची प्रक्रिया आहे. अचूक मीटर रीडिंग हे विजेची योग्य वाढती मागणी नोंदवणे व ग्राहकांच्या बिलिंग तक्रारी कमी करणे याकरता महत्वपूर्ण असते.

**मीटर रीडिंग ॲप :** आधीच्या फोटोमीटर रीडिंग पध्दती ऐवजी हे मोबाईल ॲप मीटर रीडिंगसाठी वापरले जात आहे. मीटर रीडर ग्राहक परिसराला भेट देतो. तो या मोबाईल ॲपद्वारे मीटरचा फोटो आणि मीटरचे रीडिंग घेतो आणि बिलिंगच्या उद्देशाने थेट मध्यवर्ती सर्व्हरवर पाठवितो. जिथे मीटर रीडरने मीटर रीडिंग घेण्यासाठी ग्राहकाच्या परिसरात(स्थानाला) प्रत्यक्ष भेट दिली आहे त्या स्थानाचे अक्षांश रेखांश मीटर रीडिंग घेतांना ॲप नोंद करते. लोकेशन डेटाच्या मदतीने मीटर रीडरने योग्य ग्राहकाचे मीटर रीडिंग योग्य ठिकाणाहून घेतले आहे याची खात्री केली जाते.

**मीटर रीडिंग ॲप कार्यपद्धती :** एजन्सी/मीटर रीडर वापरकर्त्यांचे व्यवस्थापन, मीटर रीडिंग जॉब आणि मीटर रीडर्सना त्यांची नियुक्ती हे सर्व मोबाइल ॲप वेब कन्सोलद्वारे दिलेल्या वर्क ऑर्डरनुसार हाताळले जाते. उपविभाग अधिकारी किंवा एजन्सी पर्यवेक्षक वेब कन्सोलद्वारे गाव-निहाय, एमआर-रूट-निहाय किंवा डीटीसी -निहाय मीटर-रीडिंग जॉब तयार करू शकतात. मोबाईल ॲप वेबकन्सोलवर प्रमाणीकरण अहवाल आणि जॉब आकडेवारी पाहू शकतात. एजन्सी आणि कर्मचाऱ्यांसाठी सर्व सांख्यिकीय अहवाल आणि तपशीलवार याद्या वेब कन्सोलवर उपलब्ध आहेत. मीटर रीडिंग ॲपवर नियुक्त केलेल्या कार्यानुसार मीटर रीडर्स ग्राहकांचे मीटर रीडिंग एक-एक करून घेतात.

- **नेमून दिलेले कार्य :** यामध्ये 'नेमून दिलेले कार्य' आणि 'DTC डाउनलोड' हे दोन टॅब आहेत.
  १. **नेमून दिलेले कार्य :** नियुक्त केलेल्या कार्यातून, मीटर रीडर मोबाईल ॲप वेब कन्सोलवरून मीटर रीडिंग जॉब किंवा बॅच डाउनलोड करेल. मोबाईल स्क्रीनवर नियुक्त केलेले सर्व जॉब दाखवले जातील, वापरकर्त्याने जॉब निवडणे आवश्यक आहे. त्यानंतर ग्राहकाचा डेटा डिव्हाइसवर डाउनलोड होईल. या मेनूचा वापर करून, तुम्ही जॉब किंवा बॅचमधील मीटरवरील आकडेवारी आणि मीटरची तपशीलवार यादी पाहू शकतात.
  २. **डी.टी.सी डाउनलोड :** हे बिलिंग युनिटमधील डीटीसीची यादी दाखवतात. मीटर रीडरला आधी डीटीसी रीडिंग घ्यावे लागते आणि त्यानंतर त्या भागातील ग्राहकांचे रिडिंग घेणे सुरू होते.
- **कॅप्चर रीडिंग :**
  १. **डी.टी.सी मीटर रीडिंग :** मीटर रीडर आधी डीटीसीचे रीडिंग घेतो.
  २. **ग्राहकाचे मीटर रीडिंग :** मीटर रीडर मीटर रीडिंग घेण्यासाठी यादीमधून ग्राहक निवडतो. एकदा ग्राहक निवडल्यानंतर, मीटर रीडिंग आणि मीटरची स्थिती सादर केली जाते आणि मीटरचे छायाचित्र घेतले जाते. हे मध्यवर्ती सर्व्हरवर पाठविले जाते.
- **वीज चोरीची माहिती द्या :** याद्वारे मीटर रीडर/कर्मचारी वीज चोरीची माहिती सबमिट करू शकतात.
- **ग्राहक नाव सुधारणा :** जर एखाद्या ग्राहकाने नाव सुधारण्यासाठी अर्ज केला असेल, तर मीटर रीडिंग सबमिट केल्यानंतर ग्राहकाचे आवश्यक कागदपत्र मीटर रीडर अपलोड करू शकतात.
- **ग्राहक पत्ता सुधारणा :** जर एखाद्या ग्राहकाने पत्ता सुधारण्यासाठी अर्ज केला असेल, तर मीटर रीडिंग सबमिट केल्यानंतर ग्राहकाचे आवश्यक कागदपत्र मीटर रीडर अपलोड करू शकतात. ■




## वीज ग्राहकांच्या सेवेसाठी 'ऊर्जा' चॅट बॉट उपलब्ध




**महावितरणच्या** वीज ग्राहकांना तक्रार निवारण, बिल भरणा, नवीन वीज जोडणी अशा विविध कामांसाठी मदत करणारे ऊर्जा हे चॅट बॉट नुकतेच सुरु करण्यात आले आहे. ऊर्जा चॅट बॉटमुळे आता वीज ग्राहकांना कार्यालयात येण्याची गरज राहणार नाही. दिवसाचे चोवीस तास आणि सप्ताहाचे सातही दिवस सेवा उपलब्ध असल्याने त्यांना सोईनुसार सेवेचा लाभ घेता येईल.

'ऊर्जा' हे चॅट बॉट महावितरणने विकसित केले आहे. कंपनीच्या वेबसाईटवर आणि ॲपवर ते उपलब्ध आहे. महावितरणशी संबंधित ग्राहकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी या चॅट बॉटमध्ये सुविधा आहे. ग्राहकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे चॅट बॉटद्वारे दिली जातात व त्यातून ग्राहकांना मार्गदर्शन होते. ग्राहकांना त्वरित प्रतिसाद तसेच जलद आणि कार्यक्षम सुविधा प्रदान करणे ही या चॅट बॉटची वैशिष्ट्ये आहेत. ■

# राज्यातील सर्व कार्यालयात लाईनमन दिवस उत्साहात साजरा

*ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या जनमित्रांबाबत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ४ मार्च रोजी राज्यातील सर्व कार्यालयांत लाईनमन दिन साजरा करण्यात आला. अनेक ठिकाणी मोटार सायकल रॅलीतून वीज सुरक्षेचे संदेश देण्यात आले. तसेच कर्मचाऱ्यांच्यात वीज यंत्रणेवर काम करतांना सुरक्षा साधनांचा वापर करावा याबाबत जागृतीही करण्यात आली. सर्व जनमित्रांना सुरक्षेची शपथ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.*

## अमरावती परिमंडल :



रॅलीला झेंडी दाखवितांना मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी, अधीक्षक अभियंता श्री. सुनिल शिंदे व मान्यवर.

**जनमित्र** हा महावितरण व्यवस्थेमधील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. परंतू विजेसारख्या अत्यंत जोखीम असलेल्या क्षेत्रात अनावधानाने झालेली चुकही क्षम्य नसते, त्यामुळे कर्मचाऱ्यांनी सुरक्षा साधनाशिवाय वीज यंत्रणेवर काम करू नये असे आवाहन करत मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी यांनी लाईनमन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

अमरावती शहर विभागाच्या वतीने आयोजित मोटार सायकल रॅलीला त्यांनी झेंडी दाखवत या कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी अधीक्षक अभियंता सर्वश्री सुनिल शिंदे व दिपक देवहाते, कार्यकारी अभियंता श्री. आनंद काटकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.मधुसूदन मराठे, उपविधी अधिकारी श्री. प्रशांत लहाने यांची प्रमुख उपस्थिती होती.

## छत्रपती संभाजीनगर परिमंडल :

**छत्रपती** संभाजीनगर परिमंडलाच्या वतीने लाईनमन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहव्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल गुप्ता होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे होते. मंचावर अधीक्षक अभियंते सर्वश्री शांतीलाल चौधरी, प्रवीण दरोली, प्रेमसिंग राजपूत (प्रभारी), उपमहाव्यवस्थापक (प्रभारी) श्री. चंद्रकांत खाडे, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी) श्रीमती किशोरी तळेले यांचीही उपस्थिती होती.

यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक श्री. गुप्ता यांनी जनमित्रांच्या सर्व अडचणी सोडवण्याचे आश्वासन दिले. डॉ. केळे म्हणाले की, जनमित्र रात्रंदिवस काम करत असतात. याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. व्यंकटेश पेन्सलवार यांनी विद्युत सुरक्षेबाबत जनमित्रांचे प्रबोधन केले. वर्षभरात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जनमित्रांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.



आयोजित कार्यक्रमात सहव्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल गुप्ता, मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे व इतर मान्यवर.

## जळगाव परिमंडल :

**जळगाव** शहरात विद्युत सुरक्षेसंदर्भात रॅली काढण्यात आली. रॅलीची सांगता परिमंडल कार्यालयाच्या प्रांगणात झाली. जळगाव मंडलातंर्गत असलेल्या लघु प्रशिक्षण सभागृहात मुख्य अभियंता श्री.कैलास हुमणे यांच्या अध्यक्षतेखाली व अधीक्षक अभियंता श्री.अनिल महाजन यांच्या उपस्थित कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच विविध ठिकाणी काढण्यात आलेल्या रॅलीत सर्व अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, उपकार्यकारी व सहायक अभियंत्यांसह मानव संसाधन, वित्त व लेखा विभागाचे अधिकारी सहभागी झाले.

## भांडुप परिमंडल :

**मुख्य अभियंता** श्री. सुनील काकडे म्हणाले, स्वतःच्या जीवाची परवा न करता ग्राहकांना प्राधान्य देऊन काम करणारा लाईनमन हा खरोखर कौतुकास्पद आहे व त्यांच्या चांगल्या कामामुळेच ग्राहकांमध्ये आपली एक चांगली प्रतिमा निर्माण होते'.

लाईनमनसाठी 'आरोग्य आणि आहार' या विषयावर श्रीमती शीतल नागरे, आहारतज्ञ, जिल्हा सामान्य रुग्णालय ठाणे यांचे व्याख्यान भांडूप विभागात आयोजित केले होते. तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रमात लाईनमन यांनी स्वतः गाणी, नृत्य व नाटकात सक्रिय सहभाग नोंदवला. याशिवाय, मुलुंड विभागात निःशुल्क नेत्रतपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.



कार्यक्रमात मुख्य अभियंता श्री. सुनिल काकडे व मान्यवर.

## कोल्हापूर परिमंडल :




मुख्य अभियंता श्री. परेश भागवत व जिल्हा विद्युत निरिक्षक शकील सुतार, उपस्थित अधिकारी व लाईनमन.

**लाईनमन** अहोरात्र परिश्रम घेऊन आपले वीजसेवेचे कर्तव्य बजावित असतात. लाईनमन विद्युत यंत्रणेतील विज वाहिन्यांचे दुरुस्तीचे कार्य करीत असतो. त्यामुळे प्रत्येक घर प्रकाशते, असे प्रतिपादन मुख्य अभियंता श्री. परेश भागवत यांनी केले.

याप्रसंगी उपस्थित जिल्हा विद्युत निरिक्षक शकील सुतार यांनी लाईनमनच्या कामाचे कौतुक करत वर्षभरात वीज कर्मचारी अपघात शून्य झाल्याचे स्पष्ट केले. यावेळी अधीक्षक अभियंता श्री. अंकुर कावळे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री.शशिकांत पाटील, कार्यकारी अभियंता (प्रशा.) श्री. अभिजीत सिकनीस, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भूपेंद्र वाघमारे, कार्यकारी अभियंते सर्वश्री सुनिल माने, दत्तात्रय भणगे, दिपक पाटील, व्यवस्थापक (मा.सं.) श्री. दिपक भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

## कल्याण परिमंडल :

**मुख्य अभियंता** श्री. धनंजय औंढेकर यांच्या हस्ते कल्याण परिमंडल कार्यालयाच्या 'तेजश्री' इमारतीत जनमित्राच्या पुतळयाचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच कर्तव्य बजावतांना प्राणांची आहुती देणाऱ्या वीज कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी जनमित्रांनी त्यांना आलेले वेगवेगळे अनुभव कथन करत आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी कल्याण मंडल एकचे अधीक्षक अभियंता श्री. दीपक पाटील, कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता श्री. दिलीप भोळे, पायाभूत आराखडा विभागाचे अधीक्षक अभियंता श्री. महेश अंचिनमाने यांच्यासह अधिकारी, अभियंते, जनमित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर परिमंडल :

**'कंपनीने** पुरविलेल्या सुरक्षा साधनांचा वापर करत अखंडीत वीजसेवा प्रदान करावी. लाईनवरती काम करत असताना युनीफॉर्मचा वापर न चुकता करावा. वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर दुरूस्ती करत असताना मोबाईल खिशात ठेवून पोलवरती चढून काम करने हे धोकादायक आहे.' असे मत मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे म्हणाले यांनी व्यक्त केले.

यावेळी सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. चेतन वाघ, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. महेंद्र चुनारकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता सर्वश्री सुबोध डोंगरे, शैलेश पाटील, आर. एल. मोरे, श्रीमती ज्योती कुमठेकर तसेच व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. संजय खाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत दोनशे लाईनमनना पुष्पगुच्छ देण्यात आला. याप्रसंगी उपकार्यकारी अभियंता आर एल मोरे यांनी विद्युत सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. उपस्थित जनमित्रांनीही आपल्या भावना यावेळी व्यक्त केल्या.




कार्यक्रमास उपस्थित मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे, इतर अधिकारी व लाईनमन.

## कोकण परिमंडल :

**रत्नागिरी** येथे अधीक्षक अभियंता श्री. स्वप्नील काटकर यांच्या अध्यक्षतेखाली लाईनमन दिवस कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. विद्युत क्षेत्राचा कणा असलेल्या लाईनमनच्या अथक परिश्रम आणि सेवेप्रती कृतज्ञता व्यक्त करताना त्यांचा सन्मान करण्यात आला. रत्नागिरी शहर, कणकवली, चिपळूण, वैभववाडी इ. ठिकाणी विद्युत सुरक्षा रॅली काढण्यात आली. विद्युत सुरक्षेबाबत रत्नागिरी लघु प्रशिक्षण केंद्रामार्फत मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) श्रीमती कल्पना पाटील, सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. वैभव थोरात, कार्यकारी अभियंते सर्वश्री श्रीमती राजश्री मोरे, नितीन पळसुलेदेसाई, दत्तात्रय साळी व उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.अप्पासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

## नागपूर परिमंडल :

**लाईनमन** हा वीज वितरण यंत्रणेचा कणा आहेत, तो कणा ताठ राहण्यासाठी व्यवस्थापन सदैव त्यांच्या पाठीशी असल्याची ग्वाही नागपूर परिक्षेत्राचे प्रादेशिक संचालक श्री. सुहास रंगारी यांनी दिली. नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.दिलीप दोडके म्हणाले, आज मोठ्या संख्येने महिला कर्मचारी देखील जनमित्र म्हणुन कार्यरत आहेत, पुरुषांच्या तुलनेत महिलांचे काम कुठेही कमी पडलेले नाही.

या कार्यक्रमाला नागपूर शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. अमित परांजपे, कार्यकारी अभियंता श्री. हेमराज ढोके व श्रीमती प्रतिक्षा शंभरकर, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अनुजा पात्रीकर यांचेसह विभागातील सर्व अभियंते व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कोरोना महामारी आणि कामावर असतांना मृत्युमुखी पडलेल्या कर्मचाऱ्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.



लाईनमन दिवस कार्यक्रमाप्रसंगी कर्मचाऱ्यांसमवेत अधिकारी

# विविध योजनांतील कामे दर्जेदार व निर्धारित मुदतीत पूर्ण करा - श्री. प्रसाद रेशमे



आढावा बैठकीत बोलताना संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे. सोबत मुख्य अभियंता श्री. सुनिल देशपांडे व इतर मान्यवर.

**केंद्र** व राज्य शासनाच्या विविध योजनांतील विद्युत विकासाची कामे दर्जेदार व निर्धारित मुदतीत पूर्ण करा. तसेच कामाच्या गुणवत्तेबाबत तडजोड करू नका, असे निर्देश संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे यांनी दिले. चंद्रपूर परिमंडल येथे झालेल्या बैठकीमध्ये श्री. रेशमे यांनी आरडीएसएस योजनेतील वाहिनी विलगीकरण, कुसुम-ब योजना, रिॲक्टिव्ह पॉवर कॉम्पेन्सेशन व प्रधानमंत्री सुर्यघर योजनेसंदर्भात आढावा घेतला.

यावेळी मुख्य अभियंता श्री. सुनिल देशपांडे,अधीक्षक अभियंता श्री. रवींद्र वांदीले व श्रीमती संध्या चिवंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. योजनांत माईलस्टोनप्रमाणे किती कामे झाली, त्यात येणारे अडथळे, त्यावरील उपाय यावर चर्चा झाली.

प्रधानमंत्री सुर्यघर योजनेत चंद्रपूर परिमंडलातील पाच हजार ग्राहकांना रूफ टॉप सोलर देण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. तसेच विविध योजनांच्या कामासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, रेल्वे, वन विभाग, स्थानिक स्वराज्य संस्थांसह विविध खात्यांशी समन्वय साधून ना-हरकत प्रमाणपत्र तातडीने प्राप्त करावे. तसेच वाहिनी विलगीकरणासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० मध्ये निवड झालेल्या उपकेंद्रांना प्राधान्य द्यावे. तसेच जे शेतकरी कृषिपंप जोडणीसाठी पैसे भरून प्रलंबित आहेत, अशा शेतकऱ्यांना कुसुम-ब योजनेतून सौर कृषिपंप घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहनही श्री. रेशमे यांनी केले. ■

# परिक्षार्थीनी नियोजनात्मक अभ्यास करून यश संपादन करावे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल गुप्ता



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सहव्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल गुप्ता

**स्पर्धा** परिक्षेतील परिक्षार्थी यांनी आपणास काय व्हायचे आहे? हे ठरवून अभ्यासक्रमाची निवड करून नियोजनबध्द पूर्व नियोजित अभ्यास करून यश संपादन करावे असे प्रतिपादन संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल गुप्ता यांनी केले.

महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे पाल्य व पालकांसाठी युपीएससी, वैद्यकीय, अभियांत्रिकी प्रवेश परिक्षा नीट, आय आय टी व समकक्ष परिक्षेची तयारी करत असलेल्या विद्यार्थी यांच्यासाठी महावितरण प्रादेशिक कार्यालयात सहव्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल गुप्ता यांनी प्रत्यक्ष व व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे विद्यार्थी यांना मार्गदर्शन करण्यासाठी कार्यक्रम घेतला, त्या प्रसंगी ते बोलत होते.

सहव्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल गुप्ता पुढे मार्गदर्शन करतांना म्हणाले की, विद्यार्थी १० वी, १२ वी, पदवी परिक्षा उत्तीर्ण होण्याअगोदर आपणाला काय व्हायचे आहे? हे पालक आणि विद्यार्थी यांनी ठरवून नियोजन करावे. आपले लक्ष नेहमी मोठे ठेवा. न्युनगंड बाळगु नये. त्यानंतर संबंधित परिक्षेसाठी लागणारे पुस्तके, नोटस, प्रश्नसंच संकलन करून अभ्यासक्रम आणि परिक्षेसाठी उपलब्ध वेळ याचे योग्य नियोजन करून अभ्यास करावा. शॉर्ट नोटस तयार करावे. प्रश्नसंचाची सतत चाचणी परिक्षा देवून आपण कोठे कमी पडतो. त्याचे आत्मपरिक्षण करावे व त्यानुसार सुधारणा करून परिक्षेची तयारी करावी. जेईई परिक्षार्थीनी एनसीईआरटी, एम. लक्ष्मीकांत आदी अभ्यासक्रमातील पुस्तकांचा अभ्यास करावा. परिक्षार्थीनी परिक्षेची तयारी करत असतांना जास्त तणावात येवू नये. परिक्षेसोबतच पुस्तक वाचन, खेळ खेळणे, मनोरंजनाचा आनंदही घ्यावा असाही सल्ला त्यांनी यावेळी दिला. यापुढे दर आठवड्याला स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या संपूर्ण महाराष्ट्रातील महावितरणचे पालक आणि विद्यार्थी यांच्यासाठी प्रत्यक्ष व व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या प्रत्यक्ष व व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे मार्गदर्शन कार्यक्रमासाठी कंपनीतील पालक, त्यांचे पाल्य, अभियंते अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. ■

# चि. निलय इंगळेचे सुयश

**चि. निलय इंगळे** याने पूर्व लंडन विद्यापीठातून एमएससी इलेक्ट्रिकल मॅनेजमेंट मध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम नुकताच उत्तीर्ण केला आहे. यापूर्वी त्यांनी मुंबई विद्यापीठात इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंगमध्ये पदविका आणि पदवी घेतली आहे. मालेगाव मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. जगदीश इंगळे यांचे ते चिरंजीव आहेत. ■



चि. निलय इंगळे

# चालू बिलांसह थकबाकी वसूल करा : श्री. अरविंद भादिकर



आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना संचालक (संचालन) श्री. अरविंद भादिकर सोबत लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे व इतर मान्यवर.

**विजेच्या** क्षेत्रात उधारीचे दिवस संपुष्टात आलेले आहेत. वीजखरेदीसाठी नगदी रक्कम देवूनच वीजखरेदी करावी लागते आहे. वीजखरेदी करण्यासाठी कर्ज घेण्याची वेळ महावितरणवर आली आहे. अशा परिस्थितीतही बँका कर्ज देण्यास धजावत नाहीत. त्यामुळे विकलेल्या विजेची शंभर टक्के वसुली होणे अत्यावश्यक झालेले आहे. त्यामुळे ग्राहकसेवेला प्राधान्य देत चालू बिलांसह थकबाकीतील किमान पन्नास टक्के वसुली केलीच पाहिजे असे निर्देश महावितरणचे संचालक (संचलन) श्री. अरविंद भादिकर यांनी दिले.

लातूर परिमंडलाचे पालकत्व स्विकारलेले संचालक (संचालन) श्री. अरविंद भादिकर हे विद्युत भवन लातूर येथे पार पडलेल्या आढावा बैठकीत बोलत होते. याप्रसंगी लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे, अधीक्षक अभियंता सर्वश्री मदन सांगळे, मकरंद आवळेकर, अनिलकुमार पाटील उपस्थितीत होते.

**महावितरणचा सोशल मिडिया फॉलो करा**

सामाजिक माध्यमांचे महत्व सांगत आपल्या कार्यक्षेत्रातील सामाजिक माध्यमांद्वारे आलेल्या तक्रारींचा त्वरीत खुलासा करावा. तसेच अधिकाधिक लोकांपर्यंत सहजरित्या पोहचण्यासाठी सोशल माध्यमे उपयुक्त असल्याचे सांगत महावितरणच्या फेसबुक, एक्स तसेच इंस्टाग्रामला फॉलो करत जास्तीत जास्त लोकांपर्यंत महावितरणची सोशल माध्यमे पोचवण्याच्या सुचनाही श्री. भादिकर यांनी आढावा बैठकीत केल्या. आढावा बैठकीस तीनही जिल्हयातील उपविभागीय अधिकारी उपस्थित होते. ■

# आंतरपरिमंडलीय नाट्य स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर परिमंडल विजेते

**छत्रपती संभाजीनगर** प्रादेशिकस्तरीय आंतरपरिमंडलीय नाट्य स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे 'उत्तरदायित्व' हे नाटक सर्वोत्कृष्ट ठरले. नांदेड परिमंडलाच्या नाटकास द्वितीय पारितोषिक मिळाले.

स्पर्धेचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल गुप्ता होते. लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे व नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. अनिल डोये हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. अधीक्षक अभियंता सर्वश्री शांतीलाल चौधरी, संजय सरग, प्रेमसिंग राजपूत यांनी स्वागत केले. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. विश्वास पाटील यांनी प्रास्ताविक केले. विधी अधिकारी श्री. सुनील पावडे यांनी आभार मानले.

स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर परिमंडलातर्फे डॉ. गणेश शिंदे लिखित व श्री. श्रावण कोळनूरकर दिग्दर्शित 'उत्तरदायित्व', नांदेड परिमंडलातर्फे श्री.रत्नाकर मतकरी लिखित व श्री. प्रमोद देशमुख दिग्दर्शित 'ब्लाइंड गेम' व लातूर परिमंडलातर्फे श्री. मोहन राकेश लिखित, श्री. विश्वनाथ राजपाठक अनुवादित व श्री. धनंजय पवार दिग्दर्शित 'आषाढातील एक दिवस' हे नाटक सादर करण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभात मुख्य अभियंते सर्वश्री डॉ. मुरहरी केळे (छत्रपती संभाजीनगर), सुंदर लटपटे (लातूर) व अनिल डोये (नांदेड) यांच्या हस्ते विजेत्यांना करंडक व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी परिक्षक श्रीमती डॉ. राखी सलगर, डॉ. सुनील टाक, प्रा. अस्लम शेख, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. विश्वास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. अधीक्षक अभियंता श्री. मोहन काळोगे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता सर्वश्री दीपक माने, विश्वनाथ लहाने, सहाय्यक अभियंता श्री. सचिन लालसरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी उच्चस्तर लिपिक (लेखा) श्री. हरीश रिडलॉन यांचे सुरेख बासरीवादन व विद्युत सहाय्यक श्री. शुभम रोकडे यांच्या तबलावादनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. जनसंपर्क अधिकारी श्री. ज्ञानेश्वर आर्दड यांनी सूत्रसंचालन केले. ■




नाट्य स्पर्धेच्या विजेत्या संघासह मुख्य अभियंते सर्वश्री डॉ. मुरहरी केळे, सुंदर लटपटे, अनिल डोये व मान्यवर.

# थकबाकी शून्य करा अन् अखंडित वीज सेवेसाठी यंत्रणा अद्यावत ठेवा
# संचालक (संचालन) श्री. अरविंद भादिकर यांचे निर्देश



कर्मचाऱ्यांचा गौरव करताना संचालक (संचालन) श्री. अरविंद भादिकर, सोबत मान्यवर.

**विजेची** थकबाकी शून्य करा, तसेच ग्राहकांना अखंडित व पुरेशा दाबाने वीजपुरवठा करण्यासाठी वीज उपकेंद्रातील यंत्रणा अद्यावत ठेवून रोहित्रांची देखभाल दुरुस्ती करावी असे निर्देश संचालक (संचालन) श्री. अरविंद भादिकर यांनी सातारा क्षेत्रीय भेटी दरम्यान वीज अभियंत्यांना दिल्या.

संचालक (संचालन) पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर श्री. भादिकर यांनी प्रथमच सातारा जिल्हा दौरा केला. आर्थिक वर्षअखेरीस होणाऱ्या वसुलीचा ग्राउंड रिपोर्ट घेताना त्यांनी अगदी शाखा कार्यालयापर्यंत भेटी दिल्या. थकबाकी शुन्य करणाऱ्या भुईंज (ता. वाई) व खंडाळा येथील जनमित्रांचा सत्कार देखील केला. तसेच इतरांनीही त्यांच्याकडील देय थकबाकी कोणत्याही परिस्थिती शून्य करण्याचे आवाहन करताना वसुलीत हयगय करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

पोवई नाका व भुईंज उपकेंद्रांना भेटी देत त्यांनी उपकेंद्रातील सर्व यंत्रणेची पाहणी केली. ते म्हणाले, 'नजीकच्या काळात महावितरणला मोठ्या प्रमाणात सौर वीज उपलब्ध होणार आहे. त्यासाठी वीज उपकेंद्रांमधील यंत्रणा सक्षम करावी. उपकेंद्रांतील देखभाल दुरुस्तीची कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण करावीत. जेणेकरुन ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करणे शक्य होईल.'

कृष्णानगर सातारा येथील मंडल कार्यालय, सातारा शहरातील शहर उपविभाग, ग्राहक सुविधा केंद्र, पोवई नाका वीज उपकेंद्र, वाई विभाग, वाई एमआयडीसीतील वीज उपकेंद्र तसेच खंडाळा उपविभागाला श्री. भादिकर यांनी भेटी दिल्या. या दौऱ्यात त्यांच्या समवेत मुख्य अभियंता श्री.सुनिल पावडे, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री.अमित बारटक्के यांचेसह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**संचालक (संचालन) श्री. भादिकर यांचे निर्देश**

- प्रत्येकाने आपल्या भागातील थकबाकी शून्य करावी
- वीज जोडणी प्रतिक्षा यादी शून्य करणे
- उपकेंद्रातील उच्चदाबाच्या रोहित्राची देखभाल दुरुस्ती
- उपकेंद्रातील बॅटरी, चार्जरची निगा राखावी
- वीज गळती रोखून बिलींग मध्ये वाढ करणे

**थकबाकी शून्य करणाऱ्या जनमित्रांचा गौरव**

थकबाकी शून्य करणाऱ्या भुईंज (ता. वाई) येथील श्री. गणेश कुदळे व श्री. प्रशांत कदम या कंत्राटी कामगारांचा तसेच खंडाळा उपविभागातील जनमित्र सर्वश्री गणेश गाडे, यशवंत खाकरे, आदित्य गायकवाड यांचा श्री. भादिकर यांनी सत्कार केला. ■

## श्री. अरविंद भादिकर यांची संचालक (संचालन) पदी निवड



श्री. अरविंद भादिकर

**महावितरणचे** संचालक (संचालन) म्हणून श्री. अरविंद भादिकर यांची निवड झाली असून त्यांनी आपला पदभार स्वीकारला आहे.

मुळचे अमरावती येथील रहिवासी असलेले श्री. भादिकर हे अमरावती शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी. ई. केल्यानंतर मार्च १९९२ साली तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडलात जळगाव जिल्ह्यातील भडगाव येथे कनिष्ठ अभियंता म्हणून रुजू झाले. त्यांनी खडका येथील ४०० किव्हो उपकेंद्रात सहाय्यक अभियंता व उपकार्यकारी अभियंता म्हणूनही काम केले. २००५ मध्ये वाशीम विभागाचे कार्यकारी अभियंता, मुख्यालयातील पायाभूत आराखडा, नागपूर ग्रामीण मंडल व अमरावती मंडल येथे अधीक्षक अभियंता, अकोला व चंद्रपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता, प्रकाशगड या महावितरण मुख्यालयात कार्यकारी संचालक (वितरण) आणि संचालक (मानव संसाधन) म्हणूनही त्यांनी काम केले आहे. ■



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अॅग्रीकल्चरच्या (MACCIA) बारामती विभागातर्फे बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुनिल पावडे यांना राज्याचे मा. उद्योगमंत्री श्री. उदय सामंत आणि MACCIA चे अध्यक्ष श्री. ललित गांधी यांच्या हस्ते 'उद्योग मित्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574 & Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : श्री. भारत पवार ● उपसंपादक : श्री. विश्वजीत भोसले
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)